HELLO लोकमत

परभणी शुक्रवार, दि.८ ऑक्टोबर २०१०

# एचआयव्ही बाधित मुलांसाठी सुसंस्कारित शिक्षण

**परभणी, दि. ७ (प्रतिनिधी)-** एचआयव्ही बाधित मुलांसाठी सुसंस्कारित शिक्षण उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न केले जातील, समाजातील सर्व स्तरातील व्यक्तींनीही त्यासाठी पुढे यावे, असे आवाहन उपस्थित मान्यवरांनी केले.

होमिओपॅथिक अकॅडमी ऑफ रिसर्च अॅन्ड चॅरिटीज या संस्थेच्यावतीने जीवनरेखा बालगृहात एचआयव्ही बाधीत मुलांना शालेय व दैनंदिन वापराच्या वस्तुंचे वाटप ३ ऑक्टोबर रोजी करण्यात आले. या निमित्त आयोजित कार्यक्रमास डॉ. ए. एल. शेळके, अॅड. अशोक सोनी, अॅड. एम. के. उबाळे आदींची प्रमुख उपस्थिती होती. डॉ. शेळके यांनी मुलांना बालसंस्कार व सर्वांगिण विकासासाठी सत्यसाई सेवा समितीमार्फत प्रयत्न करणार असल्याचे सांगितले. अॅड. अशोक सोनी यांनी शैक्षणिक सुविधा देण्यासाठी प्रयत्न करु असे सांगून या मुलांच्या उन्नतीसाठी समाजातील सर्व स्तरातील नागरिकांनी पुढे यावे, असे आवाहन केले. प्रास्ताविक होमिओपॅथिक अकादमीचे अध्यक्ष डॉ. पवन चांडक यांनी केले. ते म्हणाले की, एचआयव्ही बाधित मुलांची मोफत आरोग्य तपासणी व मोफत होमिओपॅथिक उपचार करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे दिवाळीनिमित्त या मुलांना कपडे, मिठाई, शैक्षणिक साहित्य, पोषण आहार, ब्लँकेट, सतरंजी आदी साहित्यांचे वाटप करण्यात येत आहे. डॉ. चांडक हे ज्यावेळी आरोग्य सुविधा पुरविण्यासाठी या बालगृहात गेले होते. त्यावेळेस मुले जमिनीवर झोपली होती. त्यांना या प्रकारामुळे वारंवार संसर्गजन्य रोगांचा सामना करावा लागला. या मुलांना कॉटस् उपलब्ध करुन द्यावेत या हेतुने प्रतिसाद या चित्रपटाच्या माध्यमातून जमा रकमेतून मुलांसाठी कॉटस् व इतर साहित्य देण्यात आल्याचे चांडक यांनी सांगितले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी विजय तापडीया, विशाल तोष्णीवाल, राहुल पतंगे, डॉ. निखील केंद्रेकर, अॅड. मानधने, वर्षा कालानी, पुरण अग्रवाल, अॅड. राजगोपाल मानधने आदींनी प्रयत्न केले. अॅड. मोदानी, बजाज, डॉ. दरक, सत्यनारायण चांडक, श्वेता केंद्रेकर, डॉ. ख्याती पारीख आदींची उपस्थिती होती.